R.P.A.D

**अनुकंपा तत्वावर अंगणवाडी पर्यवेक्षीका गट-क**
**या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेबाबत**

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**महिला व बाल कल्याण विभाग**
**जिल्हा परिषद आदेश क्र.एबाविसे/कार्या-१आस्था -१/४९७/२०२५**
**अहिल्यानगर, दिनांक- ०२/०७/२०२५**

वाचा :- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा सेवा प्रवेश नियम १९६७ मधील परिशिष्ठ 13 (दोन)
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक अकंपा १२२१ /प्र.क्र.१८६/ का-आठ दिनांक २६ ऑगस्ट २०२१
३. महिला व बाल विकास विभागाकडील अधिसुचना दि.४ जुन २०२१
४. जि.प.अहिल्यानगर यांचे कडील अनुकंपा नियुक्ती संदर्भातील मंजुर इतिवृत्त दिनांक २४/०६/२०२५
५. जि.प.अहिल्यानगर यांचे कडील पत्र क्रं-साप्रवि-१/०२-२०२५ अनुकंपा/२६५/२०२५ अहिल्यानगर दिनांक २५/०६/२०२५

**कै.संपत मगन ढवळे** हे **पशुधन पर्यवेक्षक** या पदावर जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असतांना त्यांचे दिनांक १४/०२/२०२४ रोजी निधन झाल्याने त्यांचे पात्र वारसदार, **मुलगी श्रीमती स्वप्नाली संपत ढवळे** यांनी स्वतः अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार सदर अनुकंपा प्रकरणाची संदर्भीय शासन निर्णयामधील निर्देशांच्या अधीन राहुन छाननी व पडताळणी केलेली आहे.

**श्रीमती स्वप्नाली संपत ढवळे**, हया महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा सेवाप्रवेश नियम १९६७ मधील परिशिष्ठ 13 (दोन) तरतुदीनुसार **अंगणवाडी पर्यवेक्षीका (गट-क)** या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याने त्या **अंगणवाडी पर्यवेक्षीका (गट-क)** या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र ठरत आहेत; त्यानुसार संदर्भीय शासन निर्णया मधील निर्देशानुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ क्रमांक ४ अन्वये मंजूर इतिवृत्तानुसार समुपदेशाद्वारे **श्रीमती स्वप्नाली संपत ढवळे** यांना पुढे नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहुन जिल्हा सेवेतील **अंगणवाडी पर्यवेक्षीका (गट-क)** या पदावर तात्पुरत्या स्वरुपात **सुधारित वेतन संरचना एस-१३ : ३५४००-११२४००** मध्ये अनुकंपा तत्वावर रकाना क्रमांक ६ मध्ये नमुद ठिकाणी पदस्थापनेने नियुक्ती करीत आहे.

| अ.क्रं | अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेल्या अर्जदाराचे नाव व पत्ता | पदनाम | मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | श्रीम. स्वप्नाली संपत ढवळे<br>मु.पो. पिंपळगाव पिसा ता. श्रीगोंदा<br>जि. अहिल्यानगर<br>पिन कोड नं.४१३७०३ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | इ.मा. व. | इ.मा.व | एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजना प्रकल्प श्रीगोंदा<br>बीट- काष्टी-३<br>ता. श्रीगोंदा |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे:-**

१. अंगणवाडी पर्यवेक्षीका (गट-क) या पदावर केलेली नेमणुक पुर्णत: हंगामी स्वरुपाची असून कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना व कारण न दाखवता जि.प च्या सेवेतून कमी करण्याचा हक्क राखून ठेवला आहे. तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकीय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

२. प्रथम नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ मधील नियम ११ परिशिष्ट 3 मध्ये नमूद केल्यानुसार सदर पदावर रुजू झालेच्या दिनांकापासून दोन महिन्याचे आत जिल्हा शल्य चिकीत्सक अहिल्यानगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैदयकीय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर केले पाहिजे

४ महाराष्ट्र शासन साप्रवि कडील क्र/व्हीसीए.१०९३/१४९९/प्रक्र-५९/सोळाअ-दि९/०३/१९९४ मधील सुचनेनुसार सदरची नियुक्ती **"चांगले चारित्र असणे"** या अटीवर देण्यात येत आहे. चारित्र्य पडताळणी कार्यालया प्रमुख यांनी सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. यामध्ये एखादी गंभीर बाब केव्हा ही निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

५ आपण विवाहीत असल्यास आपणास एकच पती/पत्नी आहे असे समजणेत येईल. एकापेक्षा अधिक पती /पत्नी असल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६ महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार उमदेवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा नियुक्तांची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल, अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत त्यो शेवटी शिकत होता, अशा मान्यताप्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराने जन्म तारखेचे परिशिष्ठ-५ अ मध्ये हमीपत्र देईल.त्यानंतर खंड बी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

७ नेमणूक झालेल्या पदावरुन स्थायी झाले नंतरच आंतर जिल्हा बदली करावयाची झाल्यास त्यासाठी शासन निर्णय दिनांक २९ सप्टेंबर २०११ मधील तरतुदीच्या व प्रचलीत शासन निर्णयाच्या अधीन राहुन तसा अर्ज आपणास प्रशासनाकडे करता येईल.

८ खात्याच्या पूर्व परवानगी शिवाय प्रशिक्षण घेता येणार नाही.

९ उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयात नेमणुक करणेत आलेली आहे त्यासंबंधीत अधिका-याकडे दयावे लागेल मी, श्री............ रा. .......... प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, जिल्हा परिषद सेवेत माझी जिल्हा सेवा वर्ग -३ अंगणवाडी पर्यवेक्षीका गट-क या पदावर झालेली नियुक्ती ही सुधारित वेतन संरचना एस १३: **३५४००-११२४००** या वेतन श्रेणीत (अधिक प्रचलित नियमानुसार मिळणारा महागाई भत्ता व इतर भत्ते) या मध्ये पुर्णपणे हंगामी स्वरुपाची असून ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषदेला पुर्ण अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणुक स्वीकारत आहे.

१० सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७मधील नियम १७ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र वशिअ/-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक २/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व असेटस एण्ड लायबीलीटीज याबाबतचे विवरणपत्र भरुन दयावे.

११ सदर पदावर रुजू झाले नंतर जर काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीचा राजीनामा दयावयाचा असेल तर त्यांनी एक महिना अगोदर तशी नोटीस देणे आवश्यक आहे. व नोटीस देणे शक्य नसेल तर नोटीसेपोटी एक महिन्याचा मुळ पगार जिल्हा फंडात भरावा लागेल.

१२ सदर नियुक्ती आदेश दिनांकापासून पदस्थापनेच्या ठिकाणी एक महिन्याचे आत हजर होणे आपणास बंधनकारक राहिल अन्यथा सदरचा नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

१३ आपण आपल्या अनुकंपा प्रकरणामध्ये सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व प्रतिज्ञापत्रांच्या आधारे व संबधीत गट विकास अधिकारी / विभाग प्रमुखांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या आधारे आपणास सदरची नियुक्ती देण्यात येत आहे. सदरकागदपत्रे खोटी असल्याचे निदर्शनास आलेस अथवा प्रतिज्ञापत्रातील कोणत्याही अटींचा भंग आपल्याकडुन भविष्यात झाल्यास आपली अनुकंपा तत्वावरील सदरची नियुक्ती तात्काळ विना नोटीस समाप्त करण्यात येईल.

१४ सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम शासनाने वेळोवेळी व परिपत्रक यामधील निर्णय/ निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

१५ सेवेत हजर झालेनंतर जिल्हा परिषद सेवा प्रवेशोत्तर परिक्षा ४ वर्षात ३ संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१६ जिल्हा परिषद सेवेत असतांना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय, धंदा,अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१७ कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत १.गट विमा योजना २. वैद्यकिय दाखला ३.जातीचा दाखला ४.जातीचे वैधता प्रमाणपत्र ५.स्वग्राम घोषणापत्र ६.शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तक भरतांना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वत: करुन घ्यावी.

१८ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२दिनांक १/०७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमदेवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दिनांक २८/५/२००५ नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१९ आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर २०११ नुसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखे पासून सहा महिन्याच्या आत जातपडताळणी समितीकडुन जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा आपली नियुक्ती रद्द केली जाईल.

२० शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र.घभाम/१००५/प्र.क्र.४६३/पापु १६ दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेबाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्याचेकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाही त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

२१ शासन वित्त विभाग क्रमांक अनियो /१००५/१२६/सेवा /४/दिनांक ३१/१०/२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण / जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२२ महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्र.क्र./३४/सेवा-४ दिनांक ३१/०३/२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुंटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक क्रमांक 202507020800025 असा आहे.

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति, **श्रीमती स्वप्नाली संपत ढवळे**
**मु.पो.पिंपळगाव पिसा ता.श्रीगोंदा जि.अहिल्यानगर** पिन **४१३७०३**

प्रत :- माहितीस्तव व पुढील आवश्यकत्या कार्यवाहीस्तव रवाना

१.जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि ),जिल्हा परिषद अहिल्यानगर
२.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( सामान्य ) जिल्हा परिषद अहिल्यानगर
३.गटविकास अधिकारी पंचायत समिती, श्रीगोंदा
४. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए. बा.वि.से.यो.प्रकल्प श्रीगोंदा

२/- संबधित अनुकंपा तत्वावर नियुक्त उमेदवारास नियमानुसार हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी.तसेच संबधितांच्या सर्व मुळ कागदपत्राची पडताळणी आपल्या स्तरावरुन करावी व त्यानंतरच संबधितास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे.संबधीताचा हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
६. निवड नस्ती

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**